# शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) कार्यालय,नाशिक

जिल्हा परिषद नाशिक

नविन प्रशासकिय इमारत,जिल्हा परिषद,त्र्यंबक नाका,नाशिक

Email ID: ednsec.zpnasik@gmail.com


**जा.क्र.जिपना/शिमा/माध्य.३ /४१७९/२०२४** **नाशिक,दिनांक २२ / ०८ / २०२४**

प्रति,

गटशिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी ,

पं.स. (सर्व) /मनपा शिक्षण मंडळ नाशिक व मालेगाव

**विषय :- इयत्ता सहावीच्या प्रवेशसाठी जवाहर नवोदय विदयालय प्रवेश चाचणी परिक्षा २०२५ चे आवेदन पत्र केवळ ऑनलाइन पध्दतीने भरण्याबाबत..**

**संदर्भ** :- १. प्राचार्य,जवाहर नवोदय विद्यालय,खेडगाव नाशिक यांचेकडील पत्र F-५-JNVST/JNV NASIK/ २०२३-२४/३०७ दिनांक १९/७/२०२४

२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपना/शिमा/माध्य.३ /३६५७/२०२४ दिनांक -२५/०७/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी, **जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश चाचणी परिक्षा -२०२५** चे आवेदनपत्र केवळ ऑनलाइन पध्दतीने भरावयाचे आहे. **जे विदयार्थी, विदयार्थिनी २०२४-२५या शैक्षणिक सत्रामध्ये ,नाशिक जिल्हयातील शासनमान्य शाळेत इयत्ता पाचवी मध्ये शिकत आहे. ज्यांची जन्मतारीख १ मे २०१३ ते ३१ जुलै २०१५ च्या दरम्यान आहेत व ते नियमित इयत्ता तिसरी आणि चौथी इयत्ता उत्तीर्ण झालेले आहेत, तसेच त्यांचे पालक नाशिक जिल्हयातील रहिवासी आहे** असे विदयार्थी, विदयार्थिनी या परिक्षेसाठी आवेदनपत्र भरण्यासाठी पात्र आहेत.

ऑनलाइन आवेदनपत्र विनामुल्य भरण्यासंबधित संपूर्ण माहिती नवोदय विदयालय समिती नवी दिल्ली च्या **http://navodaya.gov.in** नवोदय विद्यालय समिती क्षेत्रिय कार्यालय, पुणे च्या **https://navodaya.gov.in/nvs/ro/Pune/en/home/index.html** तसेच जवाहर नवोदय विद्यालय,खेडगाव नाशिकच्या **https://navodaya.gov.in/nvs/nvsschool/Nashik/en/home** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.ऑनलाइन आवेदन पत्र भरण्यासाठी **अंतिम मुदत १६ सप्टेंबर २०२४** ही आहे.

सध्यस्थितीमध्ये नाशिक जिल्हयातील आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांची मागील वर्षाच्या तुलनेत कमी दिसून येत आहे. तरी आपल्या अधिनस्त आपल्या तालुक्यातील/क्षेत्रातील शाळांच्या प्राचार्य /मुख्याध्यापकांना मागील वर्षा पेक्षा जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थी आवेदनपत्र भरण्यासाठी प्रोत्साहित करावे.

सोबत -१) नवोदय विद्यालय समिती नवी दिल्लीचे पत्रक

२) मुख्याध्यापकांनी भरावयाच्या प्रमाणपत्राचा विहित नमूना

( प्रविण पाटील ) २२/०८/२४

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक )**

**जिल्हा परीषद नाशिक**

**प्रत :** मा.जिल्हाधिकारी ,नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत :** प्राचार्य,जवाहर नवोदय विद्यालय,खेडगाव नाशिक यांना माहितीसाठी.